वर्ष- १२ | अंक- २३ | मुंबई, मंगळवार,२१ एप्रिल २०२६ ते २७ एप्रिल २०२६ | पृष्ठ-४
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027
PG|2
घरगुती क्रीम-साय
पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA
संपादक : दिपक मोरेश्वर नाईक
www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

3 → रुपाली चाकणकरांचे, ती मी नव्हेच!
समृद्धी महामार्गावर मृत्यूचं तांडव ← 4

कल्याण पूर्वेत थरारक घटना

कौटुंबिक वादातून पित्याचा अडीच वर्षांच्या मुलीवर जीवघेणा हल्ला

कल्याण : कल्याण पूर्वेतील खडेगोळी परिसरात कौटुंबिक वादाच्या पार्श्वभूमीवर एका पित्याने स्वतःच्या अडीच वर्षांच्या मुलीवर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लक्ष्मी दिनकर आणि तिचा पती विलास दिनकर यांच्यात गेल्या काही दिवसांपासून कौटुंबिक वाद सुरू होता. पतीकडून होणाऱ्या मारहाणीला कंटाळून लक्ष्मी माहेरी मध्यप्रदेशात गेली होती. दरम्यान, आरोपी विलास दिनकर तेथे जाऊन मुलगी अदितीला घेऊन कल्याणमध्ये आला आणि काही दिवस मुलीसह बेपत्ता होता.



भरात आरोपीने मुलगी अदितीच्या गळ्यावर धारदार शस्त्राने वार करत तिची हत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र आईने प्रसंगावधान राखत तात्काळ हस्तक्षेप केल्याने मुलीचा जीव वाचला.

गंभीर जखमी अवस्थेत अदितीला उल्हासनगर येथील सेंट्रल रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथील उपचारांबाबत आईने निष्काळजीपणाचा आरोप केला आहे. त्यानंतर मुलीची प्रकृती खालावल्याने तिला कल्याणमधील रुक्मिणीबाई रुग्णालयात हलविण्यात आले असून सध्या तिची प्रकृती चिंताजनक आहे.

दरम्यान, या प्रकरणातील आरोपी विलास दिनकर फरार असून कोळसेवाडी पोलीस त्याचा शोध घेत आहेत. तसेच सेंट्रल रुग्णालयातील उपचारप्रक्रियेबाबतही चौकशीची मागणी करण्यात येत आहे.

पुण्यात पीएचडी चे शिक्षण घेणाऱ्या 30 वर्षीय तरुणीनं संपवलं जीवन

सुसाईड नोटमध्ये छेडछाडीचा आरोप अन् भयंकर...

पुणे। शहरात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका 30 वर्षीय पीएचडीचे शिक्षण घेणाऱ्या तरुणीने आपलं जीवन संपवलं आहे. संबंधित प्रकरण चिंचवड परिसरातील असून या घटनेनं परिसर हादरून गेला आहे. अशातच या घटनेला एक वेगळं वळण प्राप्त झालं आहे. या प्रकरणातून माहिती समोर आली की, विद्यार्थीनीचं काही काळावधीपासून मानसिक संतुलन बिघडलं होतं.

या प्रकरणात पोलिसांनी कारवाई करत वरिष्ठ अधिकाऱ्याला अटक केली. हे प्रकरण केवळ आत्महत्येशी संबंधित नसून मानसिक छळाशी जोडण्यात आले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, अटक केलेल्या आरोपीची ओळख कोरेगाव पार्कमधील भारतीय वनस्पती कार्यालयाचे प्रमुख डॉ. ए. बेंजामिन अशी पटली होती.

पीएचडीचे शिक्षण घेणाऱ्या तरुणीच्या आत्महत्या प्रकरणात आरोपी अटकेत

डॉ. बेंजामिन हे मृत विद्यार्थिनीचे संशोधन मार्गदर्शक होते. मागील दोन वर्षांपासून तरुणी त्यांच्याच मार्गदर्शनाखाली पीएचडीचे शिक्षण घेत होती. पीडित विद्यार्थिनीने पोलीस ठाणे गाठून तक्रार नोंदवली. नंतर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेत अटक केली. तपासादरम्यान पीडित विद्यार्थिनीची एक सुसाईड नोट समोर आली, ती सुसाइड नोट महत्त्वाचा पुरावा ठरली आहे.

विनयभंगाशी संबंधित आरोपीवर गुन्हा

पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करून आत्महत्येसाठी प्रवृत्त करणे आणि महिलेवर हल्ला व विनयभंगाशी संबंधित गुन्हा दाखल केला. तपास अधिकाऱ्यांचे म्हणणे असे की, सर्व आरोपांचे गांभीर्य ओळखून चौकशी केली जात असून पुराव्याच्या आधारे पुढील कारवाई केली. प्रकारणाचे गांभीर्य लक्षात घेत, पोलीस बारकाईने तपास करत आहेत.

पोलीस निरीक्षक भोजराज मिसाळ यांनी माहिती दिली की, आरोपीने न्यायालयात हजर करण्यात आले. 15 एप्रिलपर्यंत त्यांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. चौकशीदरम्यान आरोपीने अनेक प्रश्न उपस्थित केलेत. विद्यार्थिनीवर कोणता दबाव आणला गेला होता, याबाबतची माहिती पोलीस जाणून घेत आहेत. आरोपीविरुद्ध संभाव्य तक्रारींचा तपास केला जातोय.

या प्रकरणाने शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि मानसिक आरोग्याबाबत पुन्हा एकदा गंभीर चिंता निर्माण झाली. विशेषतः संशोधन मार्गदर्शक आणि विद्यार्थी यांच्यातील संबंधांमध्ये पारदर्शक आणि उत्तरदायित्वाची गरज यातूनच अधोरेखित होते. सध्या या प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.



डोंबिवलीजवळ देसाई गावात उत्पादन शुल्क विभागाची धडक; ७.५ लाखांचा गावठी दारूसाठा जप्त, दोघे ताब्यात



कल्याण : राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने डोंबिवलीजवळील देसाई गावात धडक कारवाई करत मोठ्या प्रमाणावर हातभट्टीची दारू जप्त केली. या कारवाईत सुमारे ७ लाख ५० हजार रुपये किमतीचा गावठी दारूसाठा हस्तगत करण्यात आला असून दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भरारी पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. छाप्यात तब्बल २८०० लिटर हातभट्टीची दारू जप्त करण्यात आली. परिसरात बेकायदेशीररित्या दारू निर्मिती व साठा करण्यात येत असल्याचे उघड झाले आहे.

दरम्यान, संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून या प्रकरणी अधिक तपास उत्पादन शुल्क विभागाकडून करण्यात येत आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

सोशल मीडियावर राजू शेख झाला अजय म्हस्के, तरूणीची फसवणूक

पालघर। पालघर जिल्ह्यात सोशल मीडियाच्या माध्यमातून एका महिलेला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिची आर्थिक व मानसिक फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. बनावट ओळख वापरून विश्वास संपादन करत लाखो रुपये उकळल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बीड जिल्ह्यातील राजू सिकंदर शेख या व्यक्तीने अजय म्हस्के या नावाने बनावट सोशल मीडिया अकाउंट तयार केले होते. त्याद्वारे त्याने 29 वर्षीय महिलेशी संपर्क साधत हळूहळू जवळीक निर्माण केली. लग्नाचे आमिष दाखवत आरोपीने तिचा विश्वास जिंकला. यानंतर संबंधित महिलेला मंदिरात नेऊन खोटे लग्न केल्याचा बनाव करण्यात आला. पुढील सहा महिन्यांत आरोपीने तिच्याकडून सुमारे अडीच लाख रुपये उकळल्याचे समोर आले आहे. तसेच, आरोपीच्या पत्नीने अश्लिल फोटो व व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत आणखी दोन लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप आहे. घडलेल्या प्रकारामुळे घाबरलेल्या पीडितेने केळवे सागरी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. पोलिसांनी तत्काळ हालचाली करत सापळा रचला आणि आरोपीला पुणे येथून अटक केली. न्यायालयाने आरोपीला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून त्याच्याविरोधात फसवणूक, खंडणी आणि ब्लॅकमेलिंगचे गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान, पीडित महिलेने इतर तरुणी व महिलांना सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तींवर सहज विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. कोणतेही आर्थिक व्यवहार करताना सतर्कता बाळगावी, असेही तिने नमूद केले आहे

कौटुंबिक वादातून मुलानेच स्वतःच्या वडिलांना संपवलं

गडचिरोली। गडचिरोली जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. गडचिरोलीच्या आरमोरी तालुक्यातील पालोरा गावात कौटुंबिक वादातून मुलाने थेट वडीलांनांचं संपवल्याची घटना समोर आली आहे. स्वतःच्या वडिलांवर कुऱ्हाडीने वार करून मुलाने निर्घृण हत्या केली आहे. देवाजी धकाते (65) असे मृतक वडिलांचे नाव असून योगेश धकाते (25) आरोपी मुलाचे नाव आहे. वडील रात्री वीटभट्टीवरून घरी परतत असताना लपून बसलेल्या योगेशने त्यांच्यावर कुऱ्हाडीने सपासप वार केले. फोनवर बोलत असलेल्या मुलीने वडिलांचा शेवटचा आक्रोश ऐकला. कौटुंबिक वाद, पत्नीसोबतचे मतभेद आणि राग यामुळे योगेशने हा टोकाचा निर्णय घेतल्याची प्राथमिक माहिती पोलिसांकडून समोर आली आहे. हत्या केल्यानंतर आरोपीने घरात जाऊन कुऱ्हाड लपवली आणि वडिलांना शोधण्याचे नाटकही केलं. मात्र पोलिसांनी खाक्या दाखवताच त्याने खुनाची कबुली दिली. पोलीसांनी आरोपी योगेश धकाते याला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

आरटीओ चलान भरण्याच्या बहाण्याने मोबाईल हॅक; ठाण्यात वृद्धाची २० लाखांची फसवणूक



ठाणे : वाहनावरील आरटीओ चलानाचा दंड प्रलंबित असल्याचा बनावट संदेश पाठवून सायबर गुन्हेगारांनी एका वृद्धाचा मोबाईल हॅक करत तब्बल २० लाख १६ हजार २१ रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना ठाण्यात उघडकीस आली आहे. याप्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, माजिवडा परिसरात राहणाऱ्या ६१ वर्षीय व्यक्तीच्या मोबाईल क्रमांकाशी त्यांचे बँक खाते जोडलेले आहे. २१ मार्च रोजी त्यांच्या व्हॉट्सॲपवर 'आरटीओ चलानाचा दंड बाकी असून तो तातडीने भरा' असा संदेश आला होता. या संदेशासोबत दंड भरण्यासाठी 'एपीके' फाईलही पाठवण्यात आली होती.

सदर फाईलवर क्लिक करण्याच्या सूचनेनुसार संबंधित वृद्धाने ती उघडताच त्यांचा मोबाईल हॅक झाला. त्यानंतर सायबर गुन्हेगारांनी त्यांच्या बँक खात्यातून १३ एप्रिल रोजी १९ लाख ९९ हजार २१ रुपये, तर १४ एप्रिल रोजी १७ हजार रुपये अशी एकूण २० लाख १६ हजार २१ रुपयांची रक्कम ऑनलाईन पद्धतीने काढून घेतली.

घडलेला प्रकार लक्षात येताच संबंधितांनी बँकेत धाव घेत तक्रार नोंदवली. तसेच सायबर फसवणुकीची ऑनलाईन तक्रारही दाखल करण्यात आली. या तक्रारीच्या आधारे कापूरबावडी पोलीस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० अंतर्गत कलम ६६ (क) आणि ६६ (ड) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, एपीके फाईलद्वारे होणाऱ्या सायबर फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने अशा अनोळखी लिंक किंवा फाईलवर क्लिक करू नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

क्राइम ब्रांचची धडक कारवाई : अल्पवयीन शोषण प्रकरणातील मुख्य आरोपी अटकेत



मुंबई : शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अल्पवयीन शोषणाच्या गंभीर प्रकरणात क्राइम ब्रांच युनिट ६ ने मोठी कारवाई करत मुख्य फरार आरोपी बाबु आयनल खान उर्फ बाबु गुरु उर्फ बाबु हिजडा (३०) याला अटक केली आहे. पोलीसांच्या माहितीनुसार, आरोपीने एका अल्पवयीन मुलाचे अपहरण करून त्याला जबरदस्तीने मुलींचे कपडे परिधान करायला लावले व तृतीयपंथी म्हणून वावरायला भाग पाडले. त्यानंतर त्याच्याकडून लोकल ट्रेनमध्ये भीक मागण्यास भाग पाडल्याचा तसेच पुरुष ग्राहकांसोबत जबरदस्तीने शारीरिक शोषण केल्याचा गंभीर आरोप आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात ह्यपॉक्सोह्लसह विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. क्राइम ब्रांच युनिट ६ ला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार आरोपी नवी मुंबईतील वाशी-कोपरी गाव परिसरात लपून बसल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सुमारे २४ तास पाळत ठेवून सापळा रचला. आरोपीला संशय आल्याने तो साथीदारांसह कारने पळून जाण्याचा प्रयत्न करत होता; मात्र पोलिसांनी पाठलाग करून ट्रॉम्बे येथील पांजरापोल जंक्शनजवळ त्याला ताब्यात घेतले.

चौकशीत आरोपीचा गुन्ह्यातील सक्रिय सहभाग उघड झाल्यानंतर त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून पुढील कारवाईसाठी त्याला शिवाजीनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. आरोपीविरुद्ध यापूर्वीही अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली असून पुढील तपास सुरू आहे.

नागपुरात 2 शॅम्पूच्या बाटलीत निघाले 50 कॅप्सूल, अंमली पदार्थांची किंमत तब्बल 4 कोटी 26 लाख



नागपूर। अंमली पदार्थांची तस्करी करणारे आरोपी काय-काय शक्कल लढवून तस्करी करतील याचा कधीच अंदाज बांधता येणार नाही. तस्करांच्या वेगवेगळ्या क्लृप्त्या पाहून तपास अधिकारी देखील चक्रावून जातात. पण तरीही अधिकारी या तस्करांचा शोध घेण्यात यशस्वी होतात. आतादेखील अशीच कारवाई समोर आली आहे. अंमली पदार्थ तस्करीसाठी गुन्हेगार कोणतेही कुटील मार्ग अवलंबू शकतात, याचा धक्कादायक नमुना नागपुरात समोर आला आहे. शॅम्पूच्या साध्या बाटल्यांमध्ये कोकेन लपवून राजधानी एक्सप्रेसमधून तस्करी केली जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. महसूल गुप्तचर संचालनालयाच्या (डीआरआय) नागपूर युनिटने केलेल्या धडक कारवाईत तब्बल 4 कोटी 26 लाख रुपये किमतीचे 853 ग्रॅम कोकेन जप्त करण्यात आले असून एका महिलेला अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी हजरत निजामुद्दीन केएसआर बेंगळुरू राजधानी एक्सप्रेसवर लक्ष ठेवले होते. संबंधित महिला दिल्लीहून बेंगळुरूकडे प्रवास करत असल्याची माहिती मिळताच अधिकाऱ्यांनी नागपूर स्थानकावर सापळा रचला. गाडी स्थानकात आल्यानंतर संशयित महिलेवर बारकाईने नजर ठेवण्यात आली. पुढे अजनी स्थानकावर गाडी थांबताच तिला ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली.

तपासादरम्यान सुरुवातीला तिच्याकडे कोणतेही संशयास्पद साहित्य आढळले नाही. तिच्या सामानात कपडे, सौंदर्य प्रसाधने आणि सामान्य प्रवासी साहित्य होते. मात्र कपड्यांमध्ये ठेवलेल्या दोन शॅम्पूच्या बाटल्या अधिकाऱ्यांना संशयास्पद वाटल्या. त्यामुळे त्या बाटल्यांमधील द्रव काढल्यानंतर अधिकाऱ्यांना मोठा धक्का बसला.

बाटल्यांमध्ये पिवळ्या रंगाच्या ५० सीलबंद कॅप्सूल्स आढळल्या. या कॅप्सूल्समध्ये पांढऱ्या रंगाचे पावडर स्वरूपातील कोकेन अत्यंत कौशल्याने लपवून ठेवण्यात आले होते. फील्ड ड्रग टेस्ट किटद्वारे तपासणी केल्यानंतर तो पदार्थ कोकेन असल्याचे स्पष्ट झाले. या कारवाईत एकूण ८५३ ग्रॅम कोकेन जप्त करण्यात आले. आंतरराष्ट्रीय काळ्या बाजारात त्याची किंमत सुमारे ४ कोटी २६ लाख रुपये असल्याचे सांगितले जाते. या प्रकरणी संबंधित महिलेला एनडीपीएस कायदा १९८५ अंतर्गत अटक करण्यात आली आहे. प्राथमिक चौकशीनंतर तिला न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने तिला न्यायालयीन कोठडीत पाठवण्याचे आदेश दिले.

दरम्यान, या तस्करीमागे मोठे आंतरराज्य रॅकेट कार्यरत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. अटक करण्यात आलेल्या महिलेच्या साथीदारांचा शोध सुरू आहे. पुढील तपासात आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. डीआरआयच्या या कारवाईमुळे अमलीपदार्थ तस्करांना मोठा धक्का बसला आहे.

रोज एक टोमॅटो खाल्ल्याने होतात अनेक फायदे



सॅलडमध्ये तसेच भाज्यांमध्ये टोमॅटोचा वापर केला जातो. मात्र तुम्हाला माहीत आहेत का रोज टोमॅटो खाण्याचे फायदे. ज्या आजारांवरील इलाज कठीण आहे, त्यावरही टोमॅटो गुणकारी आहे.

- हृदयासंबंधित रोगांपासून बचाव होतो.
- युरिन इन्फेक्शनपासून बचाव तसेच रक्तशुद्धी होते.
- पचनशक्ती वाढते. पालकाच्या रसात टोमॅटोचा रस मिसळल्याने बद्धकोष्ठतेचा त्रास होत नाही.
- टोमॅटोमध्ये असलेल्या व्हिटॅमिन 'के'मुळे हाडे मजबूत होतात. तसेच बोन टिश्यू रिपेअर होण्यास मदत होते.
- अँटीऑक्सिडंटचे भरपूर प्रमाण असलेल्या टोमॅटोमध्ये व्हिटॅमिन 'सी' आणि 'ए' असते. व्हिटॅमिन 'ए' डोळ्यांसाठी तसेच डिहायड्रेशनसाठी चांगले.
- केसांना चमकदार तसेच मजबूत बनवण्यासाठीही टोमॅटो फायदेशीर आहे.
- त्वचेला उजाळा मिळवून देण्यासाठी टोमॅटो खाणे चांगले.
- बिया नसलेल्या टोमॅटोचा सॅलडमध्ये वापर केल्यास किडनी स्टोनची शक्यता कमी होते.
- प्रतिकारक्षमता वाढते. तसेच तणावापासून दूर रोखण्यासाठीही टोमॅटो लाभदायक आहे.
- स्मोकिंगमुळे शरीराला होणाऱ्या नुकसानापासून वाचण्यासाठीही टोमॅटोचे सेवन फायदेशीर ठरते.



तुम्ही झोपताना केस बांधून झोपता की मोकळे सोडून ?

तुमचे केस लांबलचक असतील तर दिवसभर त्यांची निगा राखण्यास भरपूर वेळ तुम्ही घालवत असाल... पण, रात्री झोपताना काय करायचं हा मात्र प्रश्न तुम्हाला अनेकदा पडत असेल.



केस मोकळे सोडले तर केसांचा गुंता होणार... आणि तो सोडवताना केस तुटणार... आणि बांधून ठेवले तर केसगळती वाढणार. असा अनुभव तुम्हालाही आला असेल. पण, यावर उपाय म्हणजे तुमचे केस कसे आहेत यावर झोपताना ते कसे बांधावेत हे अवलंबून आहे.

केस स्ट्रेट असतील तर...

तुमचे केस मोकळे आणि सरळ असतील तर रात्रीच्या वेळेस तुम्ही सैलसर पोनीटेल बांधून ठेवू शकता. म्हणजे ते सकाळी फ्रिझी होत नाहीत. सैलसर वेणी बांधून ठेवल्यास केसांमध्ये गुंता होणार नाही. तसेच त्यांना नॅचरल टॅग्स मिळतील. तुमचे केस लांब असतील ते बांधून ठेवणे सोयीस्कर ठरते. पण खूप वेळ आणि घट्ट बांधून ठेवू नका. यामुळे केस तुटण्याची शक्यता अधिक आहे.

केस ओले असतील तर...

केस ओले असताना ते मूळीच बांधून ठेवू नका. परंतु केसांमधील गुंतागुंत कमी करण्यासाठी तुम्हाला ते बांधून ठेवणे गरजेचे वाटत असेल तर ते सुकल्यानंतरच बांधा. यामुळे ते तुटण्यापासून बचावतील. हाच नियम ब्लो ड्रायसाठीदेखील लागू होतो. शक्य असेल तर नैसर्गिकरीत्याच सुकवण्याचा प्रयत्न करा.

कुरळ्या केसांसाठी

तुमचे केस कुरळे असतील तर डोक्यावर त्याचा आंबाडा बांधा किंवा एका बाजूला बांधून ठेवा. यामुळे तुमची झोपमोड होणार नाही याची काळजी घ्या. पण तो खूप घट्ट बांधू नका.

घरगुती क्रीम-साय

सकाळी अंघोळ केल्यावर क्रीम लावले नाही तर एक-दोन तासांतच परत त्वचा ओढली जाते आणि कोरडीही होते. बाजारातल्या नवनवीन येणाऱ्या क्रीमचा वापर तर नेहमीच केला जातो. पण नेहमीच घरात उपलब्ध असणारे क्रीम म्हणजेच साय कधीतरी वापरून पाहा.



- एक चमचा साय व लिंबाचा रस एकत्र करून रोज चेहऱ्यावर व ओठांवर लावल्यास ते फुटत नाही.
- थोडी साय व एक चमचा डाळीचे पीठ असे घरगुती उटणे साबणाला चांगला पर्याय आहे. त्यामुळे त्वचा मुलायम होते.
- मुलतानी माती बारीक करून सायीत मिसळून चेहऱ्यावर तसेच कोपऱ्यावर लावल्यास रंग उजळतो.
- तीन चार बदाम आणि दहा बारा देशी गुलाबाच्या पाकळ्या वाटून त्यात एक चमचा साय मिसळून ते मिश्रण चेहऱ्यावर लावल्यास चेहऱ्यावरच्या सुरकूत्या आणि काळे डाग नाहीसे होतात.
- सायीत समुद्र फेसची बारीक पावडर मिळवून लावल्यास चेहऱ्यावरची मुरमे बरी होतात.
- मोसंबी किंवा संत्र्याची सालं वाटून त्यात साय मिसळून त्याचा लेप लावल्यास त्वचा मुलायम व स्वच्छ होते.
- एक चमचा साय व एक चमचा सफरचंदाचा रस एकत्र करून फेटून हलक्या हाताने चेहऱ्यावर मालीश केल्यास चेहऱ्याचा रंग उजळतो.
- थंडीच्या दिवसात खोकल्याचा त्रासही वाढतो. अशा वेळी अर्ध्या वाटी सायीत एक चमचा नारळाचा किस पाच मोठे वेलदोडे (पावडर) तसेच 10 मिरे भरडून बारीक गॅसवर परतून गरम करावे व झोपण्यापूर्वी गरमगरम खावे. थोडे दिवस असे केल्यास कोरडा खोकला बरा होतो.
- काशाच्या किंवा पितळी ताटलीत दोन चमचे ताजी साय थोडे पाणी घालून खूप फेटावे. साय हलकी होऊन लोण्यासारखी मऊ होईल. त्यात एक कापराची वडी बारीक करून मिसळावी. फोड, जखम यावर हे मलम लावल्यास फायदा होतो. हेच मलम लहान मुलांच्या टाळूवर घालून हलक्या हाताने मालीश केल्यास टाळू लवकर भरते व गरमीच्या दिवसात डोळ्याला थंडावा मिळतो.

क्रॅंटोमच्या पूरक औषधांनी आरोग्यावर दुष्परिणाम



काही वनौषधी कृत्रिम पूरकांच्या स्वरूपात घेतल्यास त्याचे आरोग्यावर वाईट परिणाम होतात, असे दिसून आले आहे. परदेशात जास्त वापरल्या जाणाऱ्या क्रॅंटोम या वनौषधीच्या पूरकांमुळे आरोग्याची हानी होत असल्याचे पुरावे समोर आले आहेत. क्रॅंटोम ही वनस्पती परदेशात लोकप्रिय असून तिचे वैज्ञानिक नाव मिट्रॅगना स्पेसिओसा आहे. ती कॉफी वर्गातील वनस्पती आहे. ऊर्जा वाढवणे व वेदना कमी करणे या दोन कारणास्तव आग्नेय आशियात मजूर लोक या वनस्पतीची पाने चावून खातात. क्रॅंटोमचा वापर अमेरिकेत बेकायदेशीर मानला जात नाही. लोक ऑनलाइन त्याची खरेदी करतात. हिरव्या पावडरच्या स्वरूपात ही पूरक औषधी मिळते. क्रॅंटोमचा अर्क सुरक्षित व नैसर्गिक मानला जातो. पण तो शरीरात गेल्यानंतर निष्क्रिय राहात नाही, असे संशोधकांचे मत असून अमेरिकेत त्याचा वापर अनेक वर्षे सुरू आहे.

काही जण त्याचा वापर नैराश्यावर करतात, तर काहींना वेदना कमी करण्यास फायदा होतो. त्यात मिट्रॅग्नाइन हा ओपिऑइड पदार्थ असतो. या औषधीच्या वापरासाठी कुठलेही वैद्यकीय पुरावे नसले तरी त्याचा वापर अफूसारखा केला जातो. ब्युप्रेनोफाइनपेक्षा ही औषधी स्वस्त असते. न्यूयॉर्क विद्यापीठाचे विल्यम एगलस्टन यांनी याबाबत केलेल्या संशोधनानुसार याचे काही विषारी परिणाम हे ते औषध बंद केल्यानंतर दिसून येतात. 'जर्नल फार्माकोथेरपी' या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे. १ जानेवारी २०११ ते ३१ जुलै २०१८ दरम्यान लोकांनी या औषधाच्या केलेल्या वापराची माहिती घेऊन हे संशोधन करण्यात आले. त्यातून असे दिसून आले की, चिडचिडेपणा, गोंधळणे, वांत्या, भ्रम, कोमात जाणे, हृदयविकार असे परिणाम यातून होतात.

आंब्याच्या पानांनी बनलेल्या चहाचे सेवन केल्याने गायब होतील आजार, जाणून घ्या याची रेसिपी

आंब्याला फळांचा राजा म्हटले जाते. आंबा खाण्यास जेवढा चविष्ट असतो, तेवढाच आरोग्यासाठीदेखील फायदेशीर असतो. एवढंच नव्हे तर आंब्याच्या पानांमध्ये देखील बरेच गुण असतात. या पानांमध्ये बरीच व्हिटॅमिन्स, मिनरल्स आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. यात उपस्थित मंगिफेर्न नावाचा पदार्थ आरोग्यासाठी फारच फायदेशीर असतो. तुम्ही या पानांचा चहा बनवून त्याचे सेवन करू शकता. यामुळे पोटाशी निगडित बऱ्याच प्रकारचे आजार दूर होतात. आंब्याच्या पानांचा चहा तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकतो.



आंब्याच्या पानांच्या चहाची रेसिपी

हा चहा तयार करण्यासाठी आंब्याची पाने घ्या. ही पाने पाण्यात टाकून पाणी अर्धे होईस्तोवर उकळा. या पानांचा आपला वेगळा फ्लेव्हर असतो. म्हणून यात साखर मिसळायची गरज नसते. तुम्हाला हवे असेल तर यात आंबा किंवा पेरूचा रस मिसळू शकता. यानंतर या चहाला कपात गाळून घ्या आणि गरमागरम याचे सेवन करा.

पोट ठेवेल निरोगी

पोटाला निरोगी ठेवण्यासाठी तुम्ही आंब्याची पाने पाण्यात टाकून उकळा आणि य पाण्याला एखाद्या भांड्यात रात्रभर ठेवा. दुसऱ्या दिवशी सकाळी या पाण्याला गाळून उपाशीपोटी याचे सेवन करा. याचे नियमित सेवन केल्याने पोटाशी निगडित सर्व समस्या दूर होण्यास मदत मिळेल.

व्हेरिकोज व्हेन्सची समस्या दूर होईल

व्हेरिकोज व्हेन्सची समस्या दूर करण्यासाठी आंब्याच्या पानांना आधी पाण्यात उकळून याचा चहा तयार करून त्याचे सेवन करा. यात तुम्ही पेरू किंवा आंब्याचा रसदेखील घालू शकता.

अस्थमाच्या रुग्णांसाठी फायदेशीर

आंब्याच्या पानांना उकळून त्या पाण्यात मध मिसळून त्याचे सेवन केल्याने ब्रॉन्कायटिस आणि अस्थमाची समस्या दूर होण्यास मदत मिळते. हा चहा खोकल्याला प्रभावीपणे ठीक करतो.

ब्लडप्रेशरसाठी फायदेशीर

उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णांसाठी देखील आंब्याच्या पानांचा चहा तसेच आंब्याची पाने टाकून उकळलेल्या पाण्याने अंघोळ करणे फायदेशीर असते.

मधुमेह रोग्यांसाठी फायदेशीर

आंब्याच्या पानांमध्ये एंथोसाइनिडिन नावाचे टॅनिन असते, जे सुरुवातीच्या मधुमेहाच्या उपचारात मदत करते. आंब्याच्या वाळलेल्या पानांची पूड करून काढा बनवून त्याचाही प्रयोग केला जातो, जो मधुमेह अँजियोपॅथी आणि मधुमेह रेटिनोपॅथीच्या उपचारात देखील मदत करतो.

वसई विरार शहर महानगरपालिका

जा.क्र : वविशम/प्रससी/जाहि/ १०२/२०२६ दिनांक २०/०४/२०२६

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४१ चे अधिसुचीतील प्रकरण ८ (कराधान नियम) मधील कलम १(१) व १(२) अन्वये व ४६९ च्या नुसार जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरणा संबधित वसई-विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय विरार येथे प्राप्त मालमत्ता प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबधाच्या हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालयात लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. करवसुलीच्या सोयीसाठी हस्तांतरण करुन महानगरपालिका पुराव्यासह नोंद घेतली जाईल.

अ.क्र	दिनांक	अनुसुचित दोन/तीन मधील नोटीसीचा मालमत्ता क्र.	करनिर्धार पुस्तकातील वॉर्ड क्र.	मालमत्तेचे ठिकाण	मालमत्तेचे स्वरुप	ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणा-याचे नाव किंवा अभिहस्तांकन कर्त्यांचे नाव	खरेदीखताचे किंवा अभिहस्तांकन कर्त्यांचे नाव
१	२०/०३/२०२६	CH०४/१५१४/१४३	४	HDIL इंडस्ट्रियल पार्क बि.नं.११ दुकान नं.११२ चंदनसार रोड	निवासी	शिवशंकर व्दारकापाल	जेम्स जॉन लोपीस/सायमन सिल्वेस्टर कोटीया
२	२०/०३/२०२६	CH०२/४२५/१९१	२	वैष्णवी आर्केड बी/१०१,कोपरी नाका,चंदनसार	निवासी	एम.जे.व्हि.कॉरपोरेशन	कविता धरम पालसिंह पायाल
३	२०/०३/२०२६	CH०२/४२५/२४२	२	वैष्णवी आर्केड बी/६०२,बि.नं.०२,कोपरी नाका,चंदनसार	निवासी	एम.जे.व्हि.कॉपरिशन	अफरीन अरशद फारुकी/अरशद मुन्ना फारुकी
४	२०/०३/२०२६	CH०२/४२५/२२२	२	वैष्णवी आर्केड बी/४०२,बि.नं.०२,कोपरी नाका,चंदनसार	निवासी	एम.जे.व्हि.कॉपोरेशन	यासमीन अरबाझ मेमन
५	२०/०३/२०२६	CH०२/४२५/४९	२	वैष्णवी आर्केड कोपरी नाका,चंदनसार गाळा नं.०२२	निवासी	एम.जे.व्हि.कॉपोरेशन	असलमभाई हबीषभाई विधानी
६	२०/०३/२०२६	CH०२/४२५/२४०	२	वैष्णवी आर्केड कोपरी नाका,चंदनसार ए/६०४,कोपरीनाका	निवासी	एम.जे.व्हि.कॉरपोरेशन	रहीम सत्तार मेमन व रेश्मी रहीम मेमन
७	२०/०३/२०२६	CH०४/१३८२/१४	४	ब्रम्हा इमा रुम नं.उ/०१,चंदनसार	निवासी	उमेश प्रकाश शेट्टी	रणधीर शंकर कनोजिया/अखलेश शंकर कनोजिया
८	२०/०३/२०२६	CH०४/१५१४/८९२	४	विराज हंन्ड इस्टेट बि.नं.५ गाळा नं.६	वाणिज्य	विराज इंटरप्राईजेस	निलेश रमणलाल जैन
९	२०/०३/२०२६	CH०४/१५१४/८९१	४	विराज हंन्ड इस्टेट बि.नं.५ गाळा नं.५	वाणिज्य	विराज इंटरप्राईजेस	निलेश रमणलाल जैन
१०	२०/०३/२०२६	CH०४/१५१४/८९०	४	विराज हंन्ड इस्टेट बि.नं.५ गाळा नं.४	वाणिज्य	विराज इंटरप्राईजेस	निलेश रमणलाल जैन
११	२०/०३/२०२६	CH०४/१५१४/८८८	४	विराज हंन्ड इस्टेट बि.नं. ५ गाळा नं.२	वाणिज्य	विराज इंटरप्राईजेस	निलेश रमणलाल जैन
१२	२०/०३/२०२६	CH०४/१५१४/८८७	४	विराज हंन्ड इस्टेट बि.नं. ५ गाळा नं.१	वाणिज्य	विराज इंटरप्राईजेस	निलेश रमणलाल जैन
१३	२३/०३/२०२६	CH०७/६९९/५०	७	जिवदानी चाळ, रुम नं.०२,बरफपाडा, भाटपाडा	निवासी	अनिता प्रविण सावंत	विशाल पुनाजी शेवाळे/वैष्णवी विशाल शेवाळे
१४	२३/०३/२०२६	CH०७/२२०/१७	७	गोविंद अपार्ट.,रुम नं.३०४, गासकोपरी	निवासी	राजेंद्र चंद्रकांत पाटील बिल्डर्स	सानिध्या संदेश भुवड
१५	२३/०३/२०२६	CH०१/२२०/२६	१	गोविंद अपार्ट.,रुम नं.००२,गासकोपरी	निवासी	भुषण रमाकांत पाटील	सुरजित नंदकिशोर चौहान/अमरावती सुरजित चौहान
१६	२३/०३/२०२६	SH०१/१०७२/१	१	जय अंबे माता कृपाचाळ फेस १, गाळा नं.१ शिरगाव	वाणिज्य	प्रविण काशिनाथ टोके	वेद इंटरप्राईजेस तर्फे ज्योती प्रशांत पाटील
१७	२३/०३/२०२६	SH०१/१०७२/२	१	जय अंबे माता कृपाचाळ फेस १, गाळा नं.२ शिरगाव	वाणिज्य	प्रविण काशिनाथ टोके	वेद इंटरप्राईजेस तर्फे ज्योती प्रशांत पाटील
१८	२३/०३/२०२६	SH०१/१०७२/३	१	जय अंबे माता कृपाचाळ फेस १,गाळा नं.३ शिरगाव	वाणिज्य	प्रविण काशिनाथ टोके	वेद इंटरप्राईजेस तर्फे ज्योती प्रशांत पाटील
१९	२३/०३/२०२६	SH०१/१०७२/५	१	जय अंबे माता कृपाचाळ फेस १, गाळा नं.६ शिरगाव	वाणिज्य	प्रविण काशिनाथ टोके	वेद इंटरप्राईजेस तर्फे ज्योती प्रशांत पाटील
२०	२०/०३/२०२६	SH०१/१०७२/६	१	जय अंबे माता कृपाचाळ फेस १, गाळा नं.५ शिरगाव	वाणिज्य	प्रविण काशिनाथ टोके	वेद इंटरप्राईजेस तर्फे ज्योती प्रशांत पाटील

सही
सहा. आयुक्त
प्रभाग समिती 'सी' चंदनसार
वसई विरार शहर महानगरपालिका

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

मुंबई, मंगळवार,२१ एप्रिल २०२६ ते २७ एप्रिल २०२६

संपादकीय

रुपाली चाकणकरांचे, ती मी नव्हेच!



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



महाराष्ट्राच्या राजकारणात अधूनमधून वादळं उठत असतात, काही दिवस गाजतात आणि मग शांत होतात. पण काही प्रकरणं अशी असतात की, ती संपूर्ण व्यवस्थेलाच हादरवून टाकतात. भोंदूबाबा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अशोक खरात प्रकरणाने नेमकं हेच केलं आहे. या प्रकरणात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केलेल्या खुलाशांनी अनेक राजकीय नावे समोर आणली आणि त्यात रुपाली चाकणकर यांचे नाव विशेषतः चर्चेत आले. या सगळ्या घडामोडीत चाकणकर यांची भूमिका ह्यती मी नव्हेचह्ण अशीच राहिलेली दिसते. पण हा नुसता नकार पुरेसा आहे का, हा प्रश्न आता अधिक तीव्रतेने विचारला जात आहे. दमानिया यांनी पत्रकार परिषदेत मांडलेले आकडे आणि तपशील हे केवळ आरोप म्हणून दुर्लक्षित करता येतील का? एखाद्या व्यक्तीने 177 वेळा फोन करणं, एका दिवशी 22 मिनिटांचं संभाषण होणं हे सगळं केवळ योगायोग म्हणता येईल का? सामान्य नागरिकाच्या दृष्टीने हे आकडे धक्कादायक आहेत. राजकारणात असलेल्या व्यक्तींनी अशा संशयास्पद व्यक्तींशी संपर्क ठेवला, तर त्यामागचा उद्देश काय असू शकतो, हा प्रश्न नैसर्गिक आहे. चाकणकर यांचा दावा आहे की, हे आरोप बेछूट, कपोलकल्पित आणि बदनामी करण्यासाठी आहेत. पण मग त्या आरोपांना ठोसपणे खोडून काढण्यासाठी त्यांनी पुढे येऊन स्पष्ट भूमिका का घेतलेली दिसत नाही? या प्रकरणात सर्वात लक्षवेधी गोष्ट म्हणजे चाकणकर यांची दीर्घकाळची शांतता. आरोप झाले, चर्चा रंगली, माध्यमांमध्ये बातम्या झळकल्या. पण त्या सुरुवातीला फारशा पुढे आल्या नाहीत. एक-दोन निवेदने, सोशल मीडियावर पोस्ट आणि आरोपांचे खंडन इतक्यावरच त्या थांबल्या. जर एखाद्या व्यक्तीवर गंभीर आरोप झाले असतील आणि ते खोटे असतील, तर त्या व्यक्तीने आक्रमकपणे समोर येऊन सत्य मांडणं अपेक्षित असतं. पण येथे उलट चित्र दिसतं. ही शांतता संशय अधिक गडद करते. चाकणकर यांची भूमिका ह्याआमचा काही संबंध नाहीह्ण अशी आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितलं की, कोणत्याही आर्थिक व्यवहारात, जमीन व्यवहारात किंवा इतर कोणत्याही दुष्कृत्यात त्यांचा सहभाग नाही. हे विधान ठाम आहे, पण त्याला पूरक अशी पारदर्शकता मात्र दिसत नाही. जर खरंच काहीच संबंध नसेल, तर इतक्या मोठ्या प्रमाणावर फोन कॉल्स का झाले? इथेच चाकणकर यांची भूमिका दुटप्पी वाटू लागते. एका बाजूला त्या स्वतःला पूर्णपणे निर्दोष ठरवतात, तर दुसऱ्या बाजूला त्या तपास प्रक्रियेपासून काहीशा दूर राहिल्यासारख्या दिसतात. जर त्या निर्दोष असतील, तर एसआयटीच्या चौकशीला सामोरे जाणं त्यांच्यासाठी संधीच ठरू शकते. स्वतःचं नाव स्वच्छ करण्याची संधी. मग त्या पुढाकार का घेत नाहीत? ह्यमला चौकशीसाठी बोलवा, मी सर्व माहिती देईनह्ण असं ठामपणे का म्हणत नाहीत? याउलट, त्यांच्या कुटुंबियांची चौकशी झाल्याची दिसते. त्यांची बहीण प्रतिभा चाकणकर आणि तन्मय चाकणकर यांची आठ तास चौकशी झाली. ही चौकशी अनेक प्रश्न निर्माण करते. जर या प्रकरणाशी काहीही संबंध नसेल, तर कुटुंबीयांचा तपासात समावेश का झाला? आणि चौकशीनंतर केवळ आरोप फेटाळून लावणं हे पुरेसं उत्तर ठरू शकतं का? राजकारणात आरोप-प्रत्यारोप नवीन नाहीत. पण प्रत्येक वेळी एक गोष्ट अपेक्षित असते ती म्हणजे उत्तरदायित्व. सार्वजनिक जीवनात असलेल्या व्यक्तींनी केवळ आरोप नाकारून चालत नाही; त्यांनी पारदर्शकतेने वागणं आवश्यक असतं. विशेषतः जेव्हा प्रकरण एका भोंदूबाबाशी संबंधित असतं आणि त्यातून समाजात चुकीचे संदेश जाऊ शकतात.

तब्बल एक महिना उलटून गेला, तरीही चाकणकर यांना अधिकृत चौकशीसाठी बोलावण्यात आलेलं नाही. त्यांना एक समन्स पाठवला होता, पण आपण दूर आहोत, महिला आहोत, अशी कारणे देऊन उपस्थित राहणे टाळले. हा मुद्दा दोन बाजूंनी पाहायला हवा. एक म्हणजे तपास यंत्रणांनी आपलं काम वेगाने करायला हवं. दुसरं म्हणजे, एखाद्या व्यक्तीने स्वतःहून पुढे येऊन तपासात सहकार्य करणं हे अधिक विश्वासार्ह ठरतं. चाकणकर यांनी हा मार्ग का स्वीकारलेला नाही? त्यांच्या भूमिकेत एक प्रकारचा विरोधाभास दिसतो. त्या म्हणतात की, त्यांच्यावर अन्यायकारक आरोप होत आहेत, पण त्याच वेळी त्या आरोपांना ठोस पुराव्यांनी प्रत्युत्तर देण्याऐवजी भावनिक भूमिका घेतात.ह्यसत्य प्रखरतेने समोर येईलह्ण हा विश्वास व्यक्त करणं सोपं आहे, पण त्या सत्याला समोर आणण्यासाठी सक्रिय प्रयत्न करणं अधिक महत्त्वाचं असतं. राजकारणात विश्वास हे सर्वात मोठे भांडवल असते. तो एकदा डळमळीत झाला की पुन्हा उभा करणं कठीण होतं. चाकणकर यांच्या बाबतीत नेमकं हेच घडतंय. त्यांची प्रतिमा, त्यांची विश्वासार्हता हे सगळं या प्रकरणामुळे धोक्यात आलं आहे. अशोक खरातसारख्या व्यक्तीशी इतक्या वेळा संपर्क का झाला, याचं स्पष्ट आणि ठोस उत्तर मिळाल्याशिवाय ही चर्चा शांत होणार नाही. हा केवळ राजकीय वाद नाही, हा नैतिकतेचा प्रश्न आहे. सार्वजनिक पदावर असलेल्या व्यक्तींनी कोणाशी संबंध ठेवावेत, किती ठेवावेत, आणि का ठेवावेत याचं भान ठेवणं आवश्यक आहे. शेवटी, ह्यती मी नव्हेचह्ण ही भूमिका कितीही वेळा मांडली, तरी ती लोकांना पटण्यासाठी केवळ शब्द पुरेसे नसतात. त्यासाठी कृती, पारदर्शकता आणि तपासाला पूर्ण सहकार्य आवश्यक असतं.

उडता महाराष्ट्र, बुडता महाराष्ट्र



रोजचं वर्तमानपत्र वाचलं, वृत्तवाहिन्या पाहिल्या तसेच समाज माध्यमावर फेरफटका मारला तरी महाराष्ट्राच्या अब्रुचे धिंडवडे निघालेले दिसतील. काय चाललंय महाराष्ट्रात, असा प्रश्न राज्याच्या कानाकोपऱ्यातून विचारला जात आहे. महाराष्ट्रात ड्रग्जमाफियांनी घट्ट पाय रोवले आहेत आणि लैंगिक शोषण सहज केले जात असल्याचे संदेश सर्वत्र जात आहे. गुन्हेगारांना कडक शासन केले जाईल, कुणालाही मोकळे सोडले जाणार नाही, चौकशीअंती सत्य बाहेर येईल हे शब्द आता गुळमुळीत झाले आहेत. कारण रोज नवीन धक्कादायक प्रकरणे बाहेर येत आहेत आणि सरकारची अब्रू चव्हाट्यावर मांडली जात आहे. एवढे होऊन सर्वकाही आलबेल असल्याचे मंत्री, नेते आणि त्यांच्या समर्थकांना वाटत असेल तर ते आपण कुठल्या नंदनवनात वावरत आहोत, याचा विचार करण्याची गरज आहे. गोरेगावच्या नेस्को सेंटरमध्ये कॉन्सर्टआडून रेव्ह पार्टी होते आणि पोलिसांना याची खबरही नसते, यावर कुणाचा विश्वास बसू शकतो का? नेस्को सेंटरमध्ये हजारो तरुण येतात, खुलेआम ड्रग्जचे सेवन करतात, त्यात दोघांचा बळी गेल्यावर सरकारी यंत्रणा जागी होते. मग या अपयशाचे खापर कुणावर फोडायचे? राज्यात अमली पदार्थांची खुलेआम विक्री होत आहे. नेस्कोमधील ड्रग्ज पाटीर्चे प्रकरण बाहेर येताच अंधेरीत एका भाड्याच्या खोलीतील ड्रग्जची फॅक्टरी पोलिसांनी उद्ध्वस्त केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच गृहखात्याची जबाबदारी आहे. त्यांनी ड्रग्जची पाळेमुळे खोदण्यासाठी कंबर कसली आहे. ड्रग्ज पकडले जात आहेत, हे पोलिसांचे यश मानले तरी ड्रग्जच्या फॅक्टरीचे सूत्रधार कोण, ड्रग्जची खुलेआम विक्री कशी होते याची उत्तरे मिळत नाहीत. ठाणे पोलिसांनी यंदा जानेवारीमध्ये 27 कोटी 21 लाखांचे एमडी ड्रग्ज मुंब्रा परिसरात जप्त करून पाच जणांना अटक केली होती. सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यामधील पाचुपतेवाडीतून यंदा जानेवारीत महसूल गुप्तचर संचालनालयाने तब्बल 6 हजार कोटींचे एमडी ड्रग्ज जप्त केले होते. तर डिसेंबर 2025 मध्ये याच सातारा जिल्ह्यामधील सावरी गावातील शेडवर मुंबई पोलिसांनी छापा टाकत 45 किलोचा म्हणजेच तब्बल 145 कोटी रुपयांचा ड्रग्जचा साठा जप्त केला होता. या प्रकरणांचे पुढे काय झाले, यांच्यावर राजकीय वरदहस्त होता का, हे अजून स्पष्ट झालेले नाही. नाशिकमधील एमआयडीसीमधील ललित पाटीलची ड्रग्ज फॅक्टरी ऑक्टोबर 2023 मध्ये साकीनाका पोलिसांनी उद्ध्वस्त करून 300 कोटींचे 150 किलो ड्रग्ज जप्त केले होते. हाच ड्रग्जमाफिया 2 ऑक्टोबर 2023 मध्ये पुण्याच्या ससून रुग्णालयातून फरार झाला होता. त्याला 15 दिवसांनी चेन्नईमधून अटक करण्यात आली. त्यानंतर या प्रकरणाचे काय झाले, याची फारशी माहिती बाहेर आली नाही. राज्यात गुटखाबंदी असताना खुलेआम विक्री होते. ड्रग्जचेही असेच झाले आहे. त्यामुळे उडता महाराष्ट्र, अशी महाराष्ट्राची प्रतिमा होत आहे. ड्रग्जचे आव्हान पेलत असताना लैंगिक शोषण, अत्याचाराच्या घटनांमुळे महाराष्ट्राची प्रतिमा अत्यंत मलीन होत आहे. भोंदूबाबा अशोक खरातचे प्रकरण सध्या खूपच चर्चेत आहे. त्याने महिलांना फसवून त्यांच्यावर केलेले लैंगिक अत्याचार, जमवलेली आर्थिक माया आणि या सर्वांवर असलेला राजकीय वरदहस्त लपून राहिलेला नाही. अनेक संसार उद्ध्वस्त करणाऱ्या या लिंगपिसाट भोंदू खरातला कठोरातील कठोर शिक्षा व्हायला हवी. मात्र, या प्रकरणात खरातची पत्नी फरार झाली आहे. ज्यांच्यावर आरोप झाले त्यांची अजून चौकशीही झाली नाही. त्यामुळे जरी एसआयटीकडून चौकशी सुरू असली तरी याचा तपास खरंच गांभीयार्ने होत आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. खरात फाईल्स सुरू असतानाच नाशिकमधील एका मल्टीनॅशनल कंपनीतील लैंगिक शोषण आणि धर्मांतर प्रकरण समोर आले. हे प्रकरणही खरात फाईल्सएवढेच गंभीर आहे. पोलिसांनी आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. लक्षात आलेली बाब म्हणजे यातील आरोपी मुस्लीम आहेत. त्यानंतर अमरावतीमध्ये एका युवकाने 180 लैंगिक अत्याचार केल्याचे आणखी एक धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. याने त्यांचे साडेतीनशे व्हिडिओ बनवून व्हायरल केले आहेत. यातील आरोपीही मुस्लीम आहेत. ही तिन्ही प्रकरणे महाभयंकर असून यातील कुठलेही आरोपी सुटता कामा नयेत. मात्र, इथे आरोपींमध्ये धार्मिक भेदभाव केल्याचे चित्र दिसत आहे. खरात प्रकरणात भाजपकडून विधाने करणे टाळली जात होती. मात्र, नाशिक आणि अमरावतीमधील लैंगिक शोषण आणि धर्मांतराचा मुद्दा आल्यानंतर भाजप अचानक जास्तच आक्रमक झाला आहे. त्यांचे आमदार-खासदार बोलू लागले आहेत.मुळात महिलांवरील अत्याचार हा कुठल्याही जात-पंथ-धर्मापुरता विषय असू शकत नाही. एखाद्यावर आरोप झाल्यानंतर तो कोणत्या पक्षाचा आहे, याची चर्चा आपल्याकडे पहिल्यांदा होते. त्यानंतर त्याच्या पक्षाला त्या गुन्ह्याशी जोडले जाते. हे चुकीचे असून त्याचा पायंडा पडला आहे. राज्यात लैंगिक अत्याचारांच्या घटना उघडकीस येत आहेत, ड्रग्ज पकडले जात आहेत. याचा अर्थ गुन्हेगारांची हिंमत वाढली आहे, असाच होतो. गुन्हे करण्याची हिंमत होणार नाही, एवढी आपली पोलीस यंत्रणा सक्षम असायला हवी. दुदैर्वाने राजकीय दावणीला पोलीस बांधले गेल्याचे चित्र दिसत आहे. म्हणूनच उडता महाराष्ट्र आणि बुडता महाराष्ट्र ही निर्माण होणारी प्रतिमा तातडीने पुसून टाकण्याची गरज आहे. कारण महाराष्ट्राच्या नावामागे आजही पुरोगामी असे बिरुद आहे, ते पुसले जाणार नाही, याची काळजी सरकारने घ्यायला हवी.

सक्षम नारीशक्ती की निवडणुकीसाठी युक्ती !



महिला आरक्षण कायदा अर्थात नारी शक्ती वंदन कायदा-2023 दुरुस्तीसाठी केंद्र सरकारनं आजपासून संसदेचं विशेष अधिवेशन बोलावलं आहे. आगामी लोकसभा-2029 निवडणुकीपासून या कायद्याची अंमलबजावणी करुन महिलांना कायदेमंडळात अधिकाधिक प्रतिनिधित्व देण्यासाठीच हे अधिवेशन बोलावल्याचं सरकारकडून सांगण्यात येत आहे. प्रत्यक्षात, महिला आरक्षणाच्या आडून सोयीची मतदारसंघ पुनर्रचना करुन आगामी निवडणुकीत त्याचा फायदा उचलणं हाच या अधिवेशनाचा मुख्य उद्देश असल्याचा आरोप विरोधकांकडून होतोय. केंद्रातील भाजपप्रणित सरकारनं मंगळवारी संविधान (एकशे सहावी दुरुस्ती) अधिनियम, 2023 (नारी शक्ती वंदन कायदा) मध्ये दुरुस्तीचा प्रस्ताव मांडला. ही दुरुस्ती 16 ते 18 एप्रिलदरम्यान चालर्णाया संसदेच्या विस्तारित अर्थसंकल्पीय अधिवेशनात मंजूर केली जाईल. लोकसभा, राज्यांच्या विधानसभा, दिल्ली राष्ट्रीय राजधानी प्रदेश आणि केंद्रशासित प्रदेशांत महिलांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींच्या महिलांसह) एक तृतीयांश आरक्षण देणं हा या दुरुस्ती विधेयकाचा उद्देश आहे. यावर चचेर्साठी हे विशेष अधिवेशन बोलावण्यात आल्याचं सरकारकडून सांगण्यात येत आहे. तत्पूर्वी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व राजकीय पक्षांच्या प्रमुखांना पत्र लिहून हे विधेयक लोकसभा आणि राज्यसभेत मंजूर करण्यासाठी पाठिंबा देण्याची विनंती केली. यामुळं एक नवा वाद निर्माण झाला आहे. महिला आरक्षण कायदा 2023 (नारी शक्ती वंदन कायदा) च्या अंमलबजावणीला गती देण्यासाठी जे घटनादुरुस्ती विधेयक आणलं जाणार आहे, त्याच्या जोडीलाच मतदारसंघ पुनर्रचना कायद्याशी संबंधित एक विधेयक आणि दिल्ली, जम्मू-काश्मीर व पुद्दुचेरी (विधानसभा असलेले तीन केंद्रशासित प्रदेश) यांच्यासाठीही एक विधेयक सादर केलं जाणार आहे. ही विधेयके संसदेत मंजूर झाल्यानंतर लोकसभेची सदस्यसंख्या सध्याच्या 543 वरून थेट 850 पर्यंत जाईल. संविधान (131वी सुधारणा) विधेयक, 2026 द्वारे हा बदल सुचवण्यात आला आहे. हे नवीन बदल 2029 च्या लोकसभा निवडणुकांपासून लागू होण्याची दाट शक्यता आहे. मात्र, लोकसभा मतदारसंघांच्या जागेतील ही वाढ जनगणनेच्या ताज्या आकडेवारीनुसार होणार नाही. तर, 2011 च्या अर्थात दीड दशक जुन्या जनगणनेच्या आधारे मतदारसंघांची पुनर्रचना करण्याचा केंद्र सरकारचा इरादा आहे. त्यालाच विरोधकांचा मुख्य आक्षेप आहे. महिला आरक्षण विधेयकाच्या आडून केंद्र सरकार हातचलाखी करत असल्याचा आरोप विरोधक करत आहेत. भारताच्या विकासाचा प्रवास महिलांच्या सक्षमीकरणाशी घनिष्ठपणे जोडलेला आहे. स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या आठ दशकांमध्ये सरकारच्या प्रयत्नांमुळे देशात महिला सक्षमीकरणात उल्लेखनीय प्रगती झाली आहे. सरकारी-खासगी क्षेत्रात महिला कर्मचार्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. महिला कलाकार, खेळाडू आपल्या उल्लेखनीय कामगिरीने देशाला गौरव मिळवून देत पुढच्या पिढीला प्रेरणा देत आहेत. उद्योग, विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी अशा सर्वच क्षेत्रांमध्ये भारतीय महिला आपला प्रभावी ठसा उमटवत आहेत. महिलांना केवळ कल्याणकारी योजनांच्या लाभार्थी न मानता लैंगिक भेदभावाला सामोरे जाण्यापासून ते शिक्षण, आरोग्य, गृहनिर्माण, उद्योजकता आणि सुरक्षिततेला प्रोत्साहन देण्यापर्यंतच्या विविध उपक्रमांमुळे महिलांच्या जीवनात आमूलाग्र सुधारणा झाल्या आहेत. राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीत महिला विविध टप्प्यांवर आपलं महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. याच सर्व कालखंडात महिलांना पुरुषांच्या बरोबरीनं मतदानाचा अधिकार मिळाला. सरपंचपदापासून ते पंतप्रधान आणि राष्ट्रपतीपदापर्यंत पोहोचून महिलांनी केवळ आपल्या क्षमता सिद्ध केल्या नाहीत, तर देशाला कणखर नेतृत्त्वही दिलं. परंतु, कायदेमंडळात पुरुषांच्या बरोबरीनं अधिकार मिळायला महिलांना तब्बल आठ दशकांची प्रतीक्षा करावी लागली हेदेखील वास्तव आहे. विकसित भारत बनवण्यासाठी त्यात महिलांची भागीदारी आवश्यक असल्याचं म्हणत केंद्र सरकारनं नारी शक्ती वंदन कायद्यात दुरुस्तीचा घाट घातला आहे. एका बाजूला हे विशेष अधिवेशन सुरू होत असताना दुसरीकडं पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळम, आसाम आणि पुद्दुचेरीत विधानसभा निवडणुकांचा ज्वर टिपेला पोहोचला आहे. यापैकी पहिल्या टप्प्यात केरळम, आसाम आणि पुद्दुचेरीत मतदानही झालंय. तर, दुर्सया टप्प्यात तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये 23 आणि 29 एप्रिलला मतदान होणार आहे. ही सर्वच राज्यं भाजपच्या दृष्टीनं महत्त्वाची आहेत. मागच्या 12 वर्षांचा आढावा घेतल्यास एक एक करत भाजपनं संपूर्ण उत्तर, मध्य आणि पूर्वेकडील राज्यांचा ताबा घेतला आहे. कुठं स्वबळावर तर कुठं मित्रपक्षाच्या साथीनं भाजप सत्तेवर आहे. जवळपास 20 राज्यांमध्ये भाजपची सत्ता आहे. यामध्ये केवळ दक्षिणेकडील राज्याचा अपवाद म्हणावा लागेल. गेल्या अनेक वर्षांपासून दक्षिणेत बस्तान बसवण्यासाठी भाजपकडून प्रयत्न ांची पराकाष्ठा सुरू आहे. मात्र, पहिल्यांदा कर्नाटक आणि त्यानंतर तेलंगणा अशा दोन राज्यांनी भाजपचा डाव धुळीस मिळवला. या दोन्ही राज्यात काँग्रेसनं सत्ता मिळवताना दक्षिणेकडील स्थान अधोरेखित केलं होतं. सद्यस्थितीत उत्तर भारतातून काँग्रेस हद्दपार अन् दक्षिणेतून भाजप हद्दपार अशी दोन प्रमुख पक्षांची अवस्था आहे. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी भाजपला एकहाती झुंजवत आहेत. त्यामुळं पश्चिम बंगालसह तामिळनाडू आणि केरळम ही राज्यं ताब्यात घेण्यासाठी भाजपनं पूर्ण शक्ती पणाला लावली आहे. विरोधकही या शक्तीचा जोरदार प्रतिकार करताना दिसत आहेत. अशा निवडणुकीच्या रणधुमाळीत विरोधक गुंतलेले असताना विशेष अधिवेशन बोलावणं हे केवळ राजकीय फायद्यासाठीच केलं जात असल्याचा विरोधकांचा आरोप आहे. या निवडणुका झाल्यानंतर हे अधिवेशन व खुली चर्चा करता आली नसती का असाही प्रश्न विरोधकांकडून विचारला जात आहे. सुमारे 3 वर्षांपूर्वी जेव्हा केंद्र सरकारनं संविधानाच्या कलम 334-अ मध्ये दुरुस्ती करुन नारी शक्ती वंदन विधेयक-2023 आणलं तेव्हा विरोधकांनी एकमतानं या विधेयकाला पाठिंबा दिला होता. एवढंच नाही, तर हा कायदा लवकरात लवकर लागू करण्याची मागणीही केली होती. परंतु तेव्हा आगामी जनगणना आणि नव्या आकडेवारीनुसार मतदारसंघ पुनर्रचनेनंतर हा कायदा लागू करण्यावर केंद्र सरकारचा भर होता. भारतात सुमारे 5 वर्षांच्या विलंबानंतर आता कुठं जनगणनेला सुरुवात झाली आहे. दोन टप्प्यात ही जनगणना होईल. या जनगणनेची आकडेवारी आल्यानंतर देशाची लोकसंख्या किती कोटीनं वाढली हे कळेल, देशात कुठल्या जातीची किती लोकसंख्या आहे हेदेखील स्पष्ट होईल. लोकसंख्येच्या आधारे मतदारसंघांची पुनर्रचना करता येईल. त्याऐवजी 2011 च्या जुन्या जनगणनेच्या आधारे मतदारसंघांची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न का केला जात आहे? केंद्राच्या नव्या समीकरणानुसार महिला आरक्षणासाठी जागा वाढवून देताना त्यांना पुरुष मतदारसंघांच्या जागाही कमी करायच्या नाहीत. त्यासाठी एक नवा फॉम्युर्ला केंद्रानं तयार केला आहे. या फॉर्म्युर्ल्यानुसार प्रत्येक राज्याच्या सरसकट निम्म्या जागा वाढवून महिला आरक्षणासाठी नवे मतदारसंघ तयार होतील. उदाहरण. महाराष्ट्रात 48 जागांमध्ये 24 जागा वाढवून त्या 72 केल्या जातील. उत्तर प्रदेशच्या 80 जागांमध्ये 40 जागा वाढवून 120 केल्या जातील. पश्चिम बंगालच्या 42 जागांमध्ये 21 जागा वाढवून 63 केल्या जातील. अशाप्रकारे लोकसभेच्या सध्याच्या 543 जागा वाढवून त्या थेट 850 केल्या जातील. यामध्ये नेमकं तर्कशास्त्र काय? हे कळायला मार्ग नाही. कारण या फॉर्म्युर्ल्यात ताज्या लोकसंख्येचा कुठलाही आधार घेतला जाणार नाही. केंद्र सरकारला जुन्याच जनगणनेच्या आधारे मतदारसंघांची पुनर्रचना करायची होती तर महिलांना आधीच सत्तेत वाटा देता आला असता. त्यासाठी 2023 पासून आजपर्यंत म्हणजे सुमारे 3 वर्षे वाट बघायची काहीच गरज नव्हती. आताही महिलांना योग्य प्रतिनिधित्त्व मिळवून द्यायचं असेल तर जनगणनेचे पूर्ण आकडे समोर येऊ द्यावेत. जातीय आकडेवारीनुसार महिलांना आरक्षण दिल्यानंतर मतदारसंघांची पुनर्रचना करायला काय हरकत आहे? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होत असताना नारी शक्तीच्या नावाखाली आगामी निवडणुका जिंकण्यासाठीच केंद्र सरकारची ही युक्ती असल्याची टीका होणं स्वाभाविकच आहे.

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार,२१ एप्रिल २०२६ ते २७ एप्रिल २०२६

घराच्या आवारात गांजाची लागवड... गुन्हे शाखेची धडक कारवाई, २१ किलो गांजासह आरोपी जेरबंद





या छाप्यात पोलिसांनी तब्बल २१ किलो ४३९ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला आहे. जप्त करण्यात आलेल्या या गांजाची बाजारपेठेतील अंदाजे किंमत ४ लाख ३९ हजार रुपये इतकी असल्याचे सांगण्यात आले आहे. पोलिसांनी ही सर्व झाडे उपटून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली आहे. याप्रकरणी पोलिसांनी रजाक गफुर शेख या संशयित आरोपीला जागीच अटक केली आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याची गुन्ह्याची व्याप्ती लक्षात घेऊन ४ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

सोलापूर। सोलापूर शहरात एक अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. सहसा ग्रामीण भागात किंवा दुर्गम शेतात गांजाची बेकायदेशीर लागवड केली जाते, मात्र सोलापूर शहरात चक्क एका राहत्या घराच्या आवारात गांजाची लागवड करण्यात आल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी सोलापूर शहर गुन्हे शाखेने धडक कारवाई करत मोठ्या प्रमाणात गांजाची झाडे जप्त केली असून एका आरोपीला अटक केली आहे.

नेमकी घटना काय?

सोलापूर शहर गुन्हे शाखेला शहरातील एका भागात राहत्या घराच्या आवारात आणि समोरील मोकळ्या जागेत अमली पदार्थांची (गांजा) झाडे लावल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तातडीने संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी पोलिसांना घराच्या परिसरात लावलेली गांजाची ५९ हिरवीगार झाडे आढळून आली. ही झाडे पाहून पोलीस अधिकारीही चक्रावून गेले.

शहरात खळबळ

शहराच्या मध्यवस्तीत किंवा लोकवस्ती असलेल्या भागात अशा प्रकारे अमली पदार्थांची लागवड झाल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. हा गांजा केवळ स्वतःसाठी लावला होता की याची मोठ्या प्रमाणावर विक्री केली जात होती, याचा तपास आता गुन्हे शाखा करत आहे. सोलापूर पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे अमली पदार्थ विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

'तुझ्या मुलीला माझ्याकडे पाठव...' महिला आरोपीकडे पोलिसाची आक्षेपार्ह मागणी...





अकोला। 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' हे ब्रीदवाक्य असणाऱ्या पोलीस दलाच्या प्रतिमेला धक्का देणारी एक बातमी समोर आली आहे. अकोला शहरातील सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याच्या लॉकअपमध्ये असलेल्या एका महिला आरोपीकडे, कर्तव्यावर तैनात असलेल्या सहायक पोलीस उपनिरीक्षक (एएसआय) राजेश जाधव याने तिच्या मुलीला 'शारीरिक सुखासाठी' पाठवण्याची धक्कादायक मागणी केली. या संतापजनक प्रकारामुळे पोलीस विभागात मोठी खळबळ उडाली असून, आरोपी एएसआयला तातडीने निलंबित करण्यात आले आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी फटकारले या घटनेचा एक व्हिडिओही समोर आला आहे, ज्यामध्ये वरिष्ठ पोलीस अधिकारी आरोपी एएसआयची कडक शब्दांत कानउघडणी करताना दिसत आहेत. 'वर्दी घातली आहेस ना तू... असे कृत्य करताना तुला लाज वाटली नाही का?' अशा शब्दांत वरिष्ठांनी त्याला फटकारले. संतापलेल्या अधिकाऱ्याने आरोपीला मारण्याचा प्रयत्न ही केला, मात्र वर्दीची मर्यादा राखून स्वतःला रोखले. सध्या राजेश जाधव विरुद्ध विनयभंगासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असला, तरी अद्याप त्याला अटक झालेली नाही.

कठोर कारवाईची मागणी

रक्षकच जेव्हा भक्षक बनतात, तेव्हा महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येतो. पोलीस ठाण्यासारख्या सुरक्षित ठिकाणी जर महिलांना अशा अश्लील मागण्यांचा सामना करावा लागत असेल, तर सामान्य जनतेने कोणाकडे पाहायचे, असा सवाल उपस्थित होत आहे. आर्थिक गुन्हे शाखेमार्फत या प्रकरणाचा अधिक तपास केला जात असून, आरोपीवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

पदाचा गैरवापर करत आक्षेपार्ह मागणी मिळालेल्या माहितीनुसार, ८० लाख रुपयांच्या आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यात संबंधित महिलेला अटक करून सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याच्या लॉकअपमध्ये ठेवण्यात आले होते. यादरम्यान एएसआय राजेश जाधव याने पदाचा गैरवापर करत महिलेला पैशांचे आमिष दाखवले आणि तिच्या मुलीबद्दल अत्यंत आक्षेपार्ह मागणी केली. पीडित महिलेने या प्रकाराची तक्रार वरिष्ठांकडे केल्यानंतर पोलीस विभागात खळबळ माजली.

समृद्धी महामार्गावर मृत्यूचं तांडव

भरधाव ट्रकने महिला मजुरांना चिरडलं, जालन्यात 6 महिलांचा जागीच अंत



जालना। जालना जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावर आज बुधवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास अत्यंत दुर्दैवी आणि भीषण अपघाताची घटना घडली आहे. जालन्यातील कडवंची शिवारात हा भीषण अपघात झाला असून, या अपघातात ६ महिला मजुरांचा जागीच मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. महिला मजूर ट्रकखाली चिरडल्या मिळालेल्या माहितीनुसार, नागपूरहून मुंबईच्या दिशेने वेगाने जाणाऱ्या ट्रकने महामार्गावर काम करत असलेल्या महिला मजुरांना जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की काही महिला मजूर ट्रकखाली चिरडल्या गेल्या आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या अपघातानंतर घटनास्थळी हाहाकार माजला होता.

अपघाताची माहिती मिळताच तालुका जालना पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी पंचनामा आणि पुढील तपासाची प्रक्रिया सुरू केली आहे. तसेच स्थानिक नागरिकांनीही तत्परता दाखवत मदतकार्य हाती घेतले आणि जखमींना रुग्णालयात हलवण्याचा प्रयत्न केला. लेकरांचा मन हेलावणारा आक्रोश या घटनेमुळे समृद्धी महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. महामार्गावर काम करणाऱ्या मजुरांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत का? असा सवाल उपस्थित होत आहे.

कार्यक्रमाला जाण्याआधीच आक्रित घडलं...



धुळ्यातून धक्कादायक बातमी समोर आली आहे. मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात झाला आहे. माती वाहतूक करणाऱ्या भरधाव डंपरने तिघांना चिरडल्याचे समोर आले आहे. या अपघातात काका पुतण्यासह तिघांचा मृत्यू झाला आहे. धुळ्यातील नरडाणा गावाजवळ ही घटना घडली आहे. त्यामुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आले आहे. या अपघाताबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. समोर आलेल्या माहितीनुसार, मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर नरडाणा गावाजवळ भीषण अपघात झाला आहे. भरधाव डंपरने दोन मोटरसायकलींना धडक देत चिरडले. या अपघातात अपघातात एका मोटरसायकल वर असलेले गणेश ज्ञानेश्वर माळी (वय 22) आणि सुमीत देविदास माळी (वय 14) यांचा मृत्यू झाला. बेटावद येथे कार्यक्रमासाठी जात असताना माळी या काका पुतण्याचा अपघात झाला. तसेच दुसऱ्या मोटरसायकलवर असलेल्या सुधाकर श्रावण बडगुजर (वय 50)यांचा मृत्यू झाला आहे.

दरम्यान, या अपघाताबाबत अधिकृत माहिती मिळवण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू असून, मृतांचा आकडा आणि ओळख पटवण्याचं काम सुरू आहे. या घटनेवर माजी मंत्री अर्जुन खोतकर यांनीही प्रतिक्रिया देत दुःख व्यक्त केलं आहे. पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून, अपघाताचं नेमकं कारण लवकरच स्पष्ट होणार आहे. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच नातेवाईकांपैकी कुणी रुग्णालयात पोहोचलं तर कुणी अपघातस्थळी पोहोचले. तिथलं दृश्य पाहून लेकरांनी एकच आक्रोश केला.

वडिलांसोबतच्या भांडणाचा राग मुलावर काढला

4 वर्षांच्या चिमुरड्याला हवेत भिरकावून आपटले





वसई। वसई पश्चिमेतील घर अनुपमा सोसायटी परिसरात चार वर्षीय विघ्नेश या चिमुकल्यावर अमानुष मारहाण झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी रिक्षाचालक संदीप पवार याला पोलिसांनी अटक केली असून त्याच्याविरोधात वसई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी संदीप पवार याचे विघ्नेशच्या वडिलांसोबत काही कारणावरून वाद झाले होते. या वादाच्या रागातून त्याने निरपराध मुलावर संताप काढल्याचे समोर येत आहे. संतप्त अवस्थेत आरोपीने विघ्नेशला रिक्षाच्या लोखंडी रॉडवर आपटले तसेच त्याला रस्त्यावर जोरात फेकून फरफटत नेल्याचे भयावह दृश्य समोर आले आहे.

ही संपूर्ण घटना सोसायटीतील सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली असून त्यातील दृश्ये अत्यंत धक्कादायक आहेत. या घटनेनंतर परिसरात संतापाची लाट उसळली असून नागरिकांनी आरोपीविरोधात कठोर कारवाईची मागणी केली आहे. जखमी विघ्नेशवर भाईंदर येथील ओढकार रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. मुलाच्या प्रकृतीबाबत कुटुंबीयांमध्ये मोठी चिंता व्यक्त केली जात आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)

मुख्य कार्यालय विरार

दुरध्वनी क्र. १२२५० - २४०२१७९ / २४०२५६३

जावक क्र. :- व.वि.श.म./क.वि./३३६/२५-२६

दिनांक :- १६/०४/२०२६

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	विभाग	मालमत्ता क्रमांक.	रिसीट नं	ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-या किंवा करदात्याचे नाव	खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
१	निळेमोरे-६	NL२९/१८२/१९७	२७७२६	रॉकस्टर इस्टेट प्रा. लि.	संदिप रत्नोजी बोबले/संगीता संदिप बोबले
२	निळेमोरे-६	NL२९/२३६/१७७	२७६२०	मंगल मुर्ती इस्टेट	मंगेश मनोहर बामणे
३	निळेमोरे-६	NL२९/२१०/१४९	२८०१८	अरविंद नवरंग सिंह	महेन्द्र रामचंद्र ऐनकर/मनाली महेन्द्र ऐनकर
४	निळेमोरे-६	NL२९/५०/९७	२७९९४	राधीका श्रीकृष्ण महाडीक	कुनाल श्रीकृष्णा महाडीक
५	निळेमोरे-६	NL२९/१९६/१२४	२८०१५	संजय आशा	रामानंद अवधेश ओझा
६	निळेमोरे-६	NL२९/२१४/३९	२८०१२	ब्रिजेश तिवारी	प्रकाश मिश्रा व रेनु मिश्रा
७	निळेमोरे-६	NL२९/२२९/११९	२८०१९	राजकुमार भरत गुप्ता	प्रदिपहदयनारायण सिंह/निलमी प्रदिप सिंह
८	निळेमोरे-६	NL२९/२१९/९	२८०००	पायल इंदू मदनानी व इंदू गणेश मदनानी	राजेश श्यामराज यादव/रिता राजेश यादव
९	निळेमोरे-६	२९/११९/९५	२७९९६	मयुर जे गोर	अनिल सिंह राजपुरोहीत
१०	निळेमोरे-६	NL२९/२१३/५२	२८०२३	राजकुमार तिवारी-	देवेन्द्र कुमार अहीरवार/कीतीलता
११	निळेमोरे-६	NL२९/१९३/३६	२८०२४	प्रविन मुढे	पुनिता अभिलाप मॅन्यु
१२	निळेमोरे-६	NL२९/१८७/२३	२८०२५	साई शक्ती कन्स्ट्र.	शिवानंद जे झा
१३	निळेमोरे-६	NL२९/१७७/१५८	२७७५६	त्रिमुर्ती रियालटीज	नितीन मुन्नालाल गुप्ता/मायदेवी मुन्नालाल गुप्ता
१४	निळेमोरे-६	NL२९/२१६/९	२७७६२	आदेश्वर कापोर्रेशन	संचु बाबोवशव गुप्ता
१५	निळेमोरे-६	NL२९/१५८/६	२७५८६	श्रीनाथ बिल्डर्स	निलीमा मनोहर पाटील
१६	निळेमोरे-६	NL२९/१५५/४०१	२७५८४	चंद्रशेखर पि. शिस्ते	बहादूर गोवर्धन जहाल यादव
१७	निळेमोरे-६	NL२९/२२१/७६	२५७१५	मनोज लालबहादुर सिंह	पिकी सागर मोहिते/पिकी विश्वनाथ सरकार
१८	निळेमोरे-६	NL२९/१९७/१०७	२५८१९	सुमतीनाथ बिल्डर्स	संकेत कैलाशनाथ मिश्रा
१९	निळेमोरे-६	NL२९/२१२/७४	२६८९५	गजाराम गवतराम सुथार	धिरा मुखेपाध्याय व दिपा न्वीता बॅनर्जी व पार्थ सारथी
२०	निळेमोरे-६	NL२९/१९०/४१	२५८२१	अमितकुमार यादव /निशा यादव	ब्रिज भुषन सत्यनारायण तिवारी/सरोज सत्यनारायण तिवारी

सही

(विजय शिंदे)

सहायक आयुक्त

प्रभाग समिती (ई) नालासोपारा

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com